RNI No. MAHBIL/2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष १, अंक ३३] मंगळवार, मे २६, २०१५/ज्येष्ठ ५, शके १९३७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ७०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ मे २०१५

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक एलक्युएन. १२/२०१३/प्र.क्र. १९०/अ-२.—ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या पहिल्या अधिसूचीमध्ये, उक्त अधिनियमान्वये संपादित केलेल्या जमिनीच्या संबंधातील नुकसानभरपाई पॅकेजचे घटक तसेच तिच्या मूल्यनिर्धारणाची रीत विनिर्दिष्ट केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त पहिल्या अनुसूचीच्या नोंद (२) व (३) मध्ये अनुक्रमे, ग्रामीण क्षेत्रांच्या बाबतीत ज्या घटकांद्वारे बाजारमूल्य गुणले जाणार आहेत ते घटक, समुचित शासनाने अधिसूचित केले असेल अशा नागरी क्षेत्रामधील प्रकल्पाच्या अंतरावर आधारित अनुक्रमे १.०० (एक) ते २.०० (दोन) याप्रमाणे, तसेच नागरी क्षेत्रांच्या बाबतीत १ (एक) याप्रमाणे विनिर्दिष्ट केलेले आहेत.

त्याअर्थी आता, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०३२ (२०१३ चा ३०) याच्या पहिल्या अनुसूचीच्या नोंद (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून तसेच या संदर्भात काढण्यात आलेल्या इतर सर्व शासकीय अधिसूचनाचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन समुचित शासन म्हणून, याद्वारे यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांच्या बाबतीत त्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मधील ज्या घटकाद्वारे बाजार मूल्य गुणले जाणार आहे तो घटक पुढीलप्रमाणे अधिसूचित करीत आहे :—

## अनुसूची

| अनुक्रमांक (१) | क्षेत्र (२) | घटक (३) |
|---|---|---|
| १ | (क) मुंबई महानगरपालिका अधिनियम, (१८८८ चा ३) किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) यानुसार स्थापन करण्यात आलेल्या महानगरपालिकांची क्षेत्रे. | १.०० |
| | (ख) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा.४१) याच्या कलम ४ अनुसार स्थापन केलेल्या "अ", "ब" आणि "क" वर्ग नगर परिषदांची क्षेत्रे. | |
| | (ग) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४१) यांच्या कलम ३४१-ग अनुसार स्थापन करण्यांत आलेल्या औद्योगिक नगरी. | |
| | (घ) विशेष नियोजन प्राधिकरणे, क्षेत्र विकास प्राधिकरणे, शहर औद्योगिक विकास महामंडळ (सिडको), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे महानगर विकास प्राधिकरण, पिंपरी-चिंचवड, नव-नगर विकास प्राधिकरण, नागपूर सुधार न्यास यासारखी नव-नगर विकास प्राधिकरणे तसेच ज्यांच्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या तरतुदींना अनुसरून विकास आराखडे तयार करण्यात येतात अशा पंढरपूर, शिर्डी यांसारख्या क्षेत्रांसाठी यात्रेकरू विकास प्राधिकरणे. | |
| २ | उपरोक्त खंड (क) ते (घ) मध्ये नमूद केलेली क्षेत्रे वगळता, जिल्ह्यांसाठीच्या प्रादेशिक योजनांद्वारे तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यांच्या तरतुदींना अनुसरून नगरपरिषदेत्तर क्षेत्रांसाठी तयार करण्यात आलेल्या विकास आराखड्याद्वारे समाविष्ट केलेली क्षेत्रे. | १.५० |
| ३ | उपरोक्त नोंद (१) व (२) मध्ये नमूद केलेली क्षेत्रे वगळता, ग्रामीण क्षेत्रे. | २.०० |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सु. कि. गावडे,**
शासनाचे उप सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 26th May 2015.

### *NOTIFICATION*

Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013.

No. LQN.12/2013/C.R.-190/A-2.—Whereas, in the First Schedule of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013), the component of compensation package in respect of land acquired under the said Act as well as the manner of determination of value thereof are specified;

And whereas, in entry 2 and 3 of the said First Schedule the factor by which the market value is to be multiplied in the case of rural areas is specified as 1.00 (One) to 2.00 (Two) based on the distance of project from urban area, as may be notified by the appropriate Government and in the case of urban areas is specified as 1(One), respectively;

Now, therefore, in exercise of the powers conferred by entry 2 of the First Schedule of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013) and of all other powers enabling it in that behalf, and in supersession of all other Government Notifications issued in this behalf, the Government of Maharashtra, being the appropriate Government, hereby notifies the factor by which the market value is to be multiplied in column (3) of the Schedule appended herewith in respect of the areas specified in column (2) thereof, as follows :—

*Schedule*

| Sr. No. (1) | Area (2) | Factor (3) |
|---|---|---|
| 1 | (*a*) Areas of Municipal Corporations established in accordance with the Mumbai Municipal Corporation Act (III of 1888) or the Maharashtra Municipal Corporations Act (LIX of 1949). | 1.00 |
| | (*b*) Areas of Class "A", "B" and "C" Municipal Councils established as per section 4 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XLI of 1965). | |
| | (*c*) Industrial Townships established as per section 341-G of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act,1965 (Mah. XLI of 1965). | |
| | (*d*) Special Planning Authorities, Area Development Authorities, New Town Development Authorities, such as City Industrial Development Corporation (CIDCO), Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA), Pune Metropolitan Region Development Authority (PMRDA), Pimpari-Chinchwad New Town Development Authority (PCNDTA), Nagpur Improvement Trust (NIT), as well as Pilgrim Development Authorities such as Pandharpur, Shirdi etc., for which Development plans are prepared in accordance with the provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. | |

| (1) | (2) | (3) |
|---|---|---|
| 2 | Areas covered by Regional Plans for Districts, as well as Development Plan prepared in accordance with the provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for non-Municipal Council areas, excluding the areas mentioned in clauses (*a*) to (*d*) above. | 1.50 |
| 3 | Rural area, excluding the areas mentioned in entries 1 and 2 above. | 2.00 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. K. GAWADE,

Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.